International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 35 March – April - 2026

# स्त्रीवादी विचार आणि मराठी नाटक

**उज्ज्वला दिगंबर जोशी[1], प्रा.डॉ. अशोक लिंबेकर[2]**

*[1]अभ्यासक*

*[2] मार्गदर्शक*

*Corresponding Author – उज्ज्वला दिगंबर जोशी*

**DOI - 10.5281/zenodo.20488386**

**प्रास्ताविक :**

कथा, कादंबरी,कविता, आत्मचरित्रे आणि नाटक हे साहित्याचे महत्वाचे प्रकार मानले जातात. त्यापैकी नाटक हा प्रकार साहित्यप्रकाराबरोबरच दृकश्राव्य कलाप्रकारात देखील मोडतो.नाटक या संज्ञेचा मूळ अर्थ " अभिनय करणे " होय. रंगभूमीवर नाटक सादर होत असताना नाटकातील गोष्ट, गीत,त्यातील पात्र, संवादातील फेक आणि अभिनय यांचा संगम होत असतो म्हणूनच नाटकांना " पंचमवेद" असे म्हणतात. त्यामुळे नाटक हा एक जिवंत कलाप्रकार आहे. नाटक साकारतांना त्यात विविध कलांचा समावेश होत असतो.

आरंभापासूनच मराठी नाटकाला समृद्ध अशी परंपरा लाभलेली आहे. मध्ययुगीन कालखंडात मनोरंजनाची साधने फार कमी होती. या कालखंडात दासवाणी, भजन,कीर्तन,हरिकथा,भारुड, तमाशा, लावणी, गोंधळ, कळसूत्री बाहूल्यांचे खेळ, सावल्यांचे खेळ,मुखवट्यांचे खेळ इ. लोककला समाजात लोकप्रिय होत्या. या लोकप्रियतेतूनच मराठी नाटकांची पायाभरणी धार्मिक परंपरा आणि लोकनाट्यरूपांतून भरली गेली. त्यामुळे नाटक हे मराठी मनाचा सांस्कृतिक वारसा आहे.

कालांतराने १९ व्या शतकात विष्णुदास भावे यांच्या सीता स्वयंवर (१८४३) या नाटकापासून आधुनिक मराठी नाटकाला गती मिळाली.महाराष्ट्रात या कालखंडात इंग्रज राजवट आणि आपली भारतीय संस्कृति यातील संघर्षातून मराठी नाटक पाश्चात्य धर्तीवर विकास पावू लागले. त्यातूनच मराठी नाटकांचा चेहरामोहराच बदलला. नाटकांचा जन्म लोकरंजनासाठी असला तरी ते एक समाज प्रबोधनाचे माध्यम आहे. समाजातील प्रत्येक परिवर्तनाचे पडसाद नाटकांवर पडत असतात कारण मराठी नाटके रंगभूमीवर आविष्कृत होत असल्यामुळे, मराठी नाटकांतून प्रेक्षक आणि नाटक यांचा जिवंत संवाद घडत असतो.नाटकांतून विचारांचे आणि भावनांचे आदान प्रदान होत असते. त्यामुळे मराठी माणसाला नाटके जास्त भावतात. कारण मराठी नाटक म्हणजेच मराठी मनाचा सांस्कृतिक भावविश्वानुभव!

**स्त्रीमुक्ती चळवळी आणि स्त्रीवादाची पार्श्वभूमी:**

विसाव्या शतकात स्त्रीला नेहमीच समाजात नव्हे तर कुटुंबात देखील दुय्यम स्थान होते. स्त्री ही उपभोगाची वस्तु आणि " चूल आणि मूल " सांभाळणारी आया या दोन बाबींसाठी तिचे स्थान होते. तिच्याकडे नेहमीच "अबला नारी" या भूमिकेतून पाहिले गेले. लहानपणापासून तिला नेहमी स्त्री या भूमिकेतूनच वाढवले गेले, सांभाळले गेले. कोणतीही जबाबदारी देताना ती एक मुलगी आहे, स्त्री आहे याच भूमिकेतून तिच्याकडे बघण्यात आले. तिच्या मनावर धर्मातील कर्मठता, रूढी, परंपरा, संस्कृतीतील अबला नारी

यांची बीजे तिच्यावर रुजवली गेली. शेकडो वर्षाच्या तुच्छ वागणुकीतून तिने स्वतः ला दुर्बल बनवून घेतले आणि त्यातून तिने स्वतः वरच कर्मठतेची बंधने घालून घेतली.

या पार्श्वभूमीवर,पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये अठराव्या शतकात मेरी वोलस्टोनक्राफ्ट यांनी " स्रीयांच्या हक्कांची पायमल्ली " या आपल्या ग्रंथातून त्यांनी स्री शिक्षणाचा आणि समान अधिकारांचा युक्तिवाद मांडला. यातूनच स्रीवादाची पायाभरणी झाली. सिमॉन दी बोव्हान यांनी " दी सेकंड सेक्स " या ग्रंथातून ' स्री ही स्री म्हणून जन्मत नाही तर ती घडवली जाते ' या अशा परखड विचारांतून स्री वादाची सुरुवात केली. पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये स्रीयांच्या हक्कासाठी, स्रीयांच्या अस्तित्वासाठी लढा सुरू झाला. तसेच काही पाश्चिमात्य सुधारणा वादी स्रीयांनी स्वातंत्र्य,समता आणि स्री पुरुषांना समान नैसर्गिक अधिकार प्राप्त व्हावे यासाठी जोरदार मागणी केली. स्री ही मानव आहे या अनुषंगाने तिचा विचार व्हावा. स्रीयांना सर्वच बाबतीत समान अधिकार दिले तर त्या सक्षम आणि समर्थ बनतील, अशा मागण्यांना जोर आला. यातूनच स्रीमुक्ती चळवळी आणि स्रीवादाला सुरुवात झाली. पाश्चिमात्य स्रीयांनी आपल्याविरुद्ध होणाऱ्या अन्यायाला स्वतः वाचा फोडली.

पाश्चात्य स्री वादाच्या चळवळीचे पेव सर्वचदूर पसरायला लागले. भारतात देखील स्रीवादी चळवळींची सुरुवात झाली. परंतु भारतातील स्री वाद थोडा वेगळा पाहावयास मिळतो . १९ व्या शतकात राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, महात्मा ज्योतिबा फुले, गोपाल हरी देशमुख, महादेव गोविंद रानडे इ. समाजसुधारकांनी स्री प्रश्नांकडे लक्ष द्यायला सुरुवात केली. त्यांनी इंग्रज राजवटीत सतिबंदी, विधवा पुनर्विवाह, केशपनाला विरोध, बालविवाह बंदी कायदा, स्री शिक्षण, हुंडा बंदी इ. स्री संदर्भातील कायदे आणून स्री वादी विचारसरणीला आरंभ केला. विधवा पुनर्विवाह आणि केशवपन संदर्भात लोकहितवादी आपल्या शतपत्रातून असे म्हणतात " ईश्वराने स्री व पुरुष हे सारखे उत्पन्न केले व उभयतांचे अधिकार समसमान आहेत असे असता पुरुषास पुनः विवाहाची आज्ञा आणि स्री यांस मात्र मनाई हा केवढा मोठा जुलूम?" १ याच विचारसरणीतून पुढे येऊन सावित्रीबाई फुले यांनी स्री शिक्षणाचा पाया घातला. सावित्रीबाई स्वतः त्रास सोसून शिकल्या आणि त्यांनी स्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. सावित्री बाई स्री शिक्षणाच्या आणि स्री मुक्ती चळवळीच्या पहिल्या पुरस्कर्त्या ठरल्या .

भारतीय स्री वादाच्या संदर्भात, समाजसुधारकांच्या प्रेरणेतून ताराबाई शिंदे यांनी ' स्री पुरुष तुलना ' हा निबंध लिहून त्यांनी स्रीयांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरुद्ध आवाज उठविला. त्यांनी विवाहित स्री च्या वाट्याला येणाऱ्या यमयातना, रूढी परंपरेने चालत आलेले स्रीचे कुटुंबातील दुय्यम स्थान, सामाजिक बंधने, पुरुषांना दिलेले अतोनात महत्व,विधवांचे विदारक दृश्य, केशवपन,परूषांना अनेक लग्न करण्याची मुभा अशा अनेक प्रश्नावर त्यांनी आपल्या बावन पानांच्या निबंधात भाष्य केले. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्रीयाच्या वाट्याला आलेल्या उपेक्षित, शोषित, यातनामयी जीवनाविरुद्ध लढा दिला आणि सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रात योगदान दिले त्याबरोबर पंडित रमाबाई, रमाबाई रानडे या देखील स्रीयांनी स्री यांच्या प्रश्नांसंदर्भात विधायक कार्य केले . आणि स्रीयांना स्वत्वाची जाणीव करून दिली.

स्रीवाद ही संकल्पना १९६० नंतर वेगाने पुढे आली. स्रीवाद ही संकल्पना स्री साठी केवळ सैद्धांतिक कल्पना नसून ती प्रत्यक्षात स्वतः मध्ये बदल घडवून समाजात बदल घडवून आणण्याचे एक आव्हान होते आणि हे आव्हान हळूहळू ती स्वतः मध्ये रुजवू लागली. त्यातच युनोने १९७५ हे दशक जागतिक महिला दशक म्हणून गौरवले. आणि जगातील अनेक देशांमधील स्रीयांच्या

सामाजिक स्थानाविषयी, तिच्यावर होणाऱ्या अत्याचाराविषयी विचारांना गतिशीलता आली. स्रीयांमध्ये तिच्यावर होणाऱ्या अन्याय आत्याचाराची जाणीव झाली. त्यातून सर्वत्र स्रीवादी संघटना, चळवळी उभ्या राहिल्या . स्रीमुक्ती चळवळीमुळे आदिम काळापासून असलेली तिच्यातील " स्री शक्ति, नारिशक्ती " जागृत झाली. ती स्वतः ला स्वयं प्रकाशित करू लागली. ती स्वतः मध्ये डोकावून पाहू लागली आणि मी कोण? याचा शोध घेऊ लागली.

स्रीचा माजघरातील जात्यापासून ते आकाशाला गवसणी घालण्यापर्यंतचा प्रवास सोपा नव्हता परंतु ती पुरुषप्रधान संस्कृतीतील दिव्यातून सतत सीतेसारखी अग्निपरीक्षा देत राहिली आणि स्वतः ला सिद्ध करत राहिली. तिचा हा प्रवास आजचा नव्हता . तो रामायण, महाभारत काळखंडापासून अव्याहतपणे चालू होता. तेव्हाही ती तिच्यातल्या गुणांनी तेजोमय होती आणि आजही ती तेजोमयच आहे.

**स्री मुक्ती चळवळीतून बदललेले मराठी नाटकांचे स्वरूप:**

१९६० नंतर जागतिकीकरण, आधुनिकीकरण, शहरीकरण, उदरमतवादी धोरण यांचे वारे वाहू लागले. त्याचा परिणाम सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर झाला. या कालखंडात दलित, ग्रामीण, स्रीवादी, आदिवासी, महानगरीय इ. नवे साहित्य प्रवाह युगायुगांची बंधने झुगारून, नवीन आत्मभान घेऊन उदयास आले. त्यातून साहित्य विश्व देखील बदलले. साहित्य हे समाजजीवनाचे आणि समाजमनाचे प्रतिबिंब आहे.

युनोने १९७५ हे वर्ष " आंतरराष्ट्रीय महिला वर्ष " म्हणून साजरे केल्यानंतर स्रीयांच्या स्थित्यंतराला सुरुवात झाली. स्री जीवनात प्रचंड प्रमाणात उलथापालथ झाली. या काळखंडात स्रीया आपल्या अधिकारांसाठी जागृत झाल्या. स्रीमुक्ती चळवळीतून स्रीयांना आलेल्या आत्मभानाचा वेध साहित्यातून घेतला गेला. स्री जीवनाचे स्वरूप, परिवर्तनाचे टप्पे, स्रीयांनी धारण केलेली विविध रुपे, स्वत्वाची झालेली जाणीव याचा पाठपुरावा साहित्याने घेतला. परंतु मराठी नाटकातून हे परिवर्तन प्रभावीपणे मांडले गेले. मराठी नाटक आणि समाज यांचा जिव्हाळ्याचा व घनिष्ठ संबंध आहे. १९७५ नंतर स्री जीवनात आमुलाग्र बदल घडून आला. हा बदल वास्तवातही होता आणि तोच बदल नाटकातूनही प्रभावीपणे मांडला गेला.

नाटक या कलाप्रकाराच्या इतिहासावरून ओझरती नजर टाकली असता असे लक्षात येते की नाटकातून व्यक्त झालेले सामाजिक भान थक्क करणारे आहे. कालानुरूप नाटकांचा चेहरा मोहरा बदललेला दिसून येतो. वेगवेगळ्या कालखंडाचे वहन करतांना नाटक त्या त्या प्रवाहानुसार बदलत गेले. पौराणिक नाटके, सांगीतिक नाटक, ऐतिहासिक नाटक, संस्कृत नाटके, सामाजिक नाटके, कौटुंबिक नाटके, फँटसी, स्री मुक्ती चळवळीवर आधारित नाटके अशा विविध रुपांतून नाटक प्रवाहित होत गेले. प्रत्येक कालखंडातील सामाजिकता, मानसिकता, वैचारिकता आणि सांस्कृतिकता जाणून घेण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे नाटक होय कारण नाटक हे थेट हृदयाला जावून भिडते.

१९७५ नंतर स्रीवादी साहित्य, स्री मुक्ती चळवळी, स्री मुक्ती विषयक नियतकालिके, स्री मुक्ती संघटना याच्या प्रभावाने मराठी नाटककारांनी आपल्या नाटकांतून बदललेले स्री रूप प्रभावीपणे मांडले. सामाजिक बंधने झुगारून बाहेर पडलेली स्री, शिक्षणामुळे अनेक क्षेत्रे काबिज करणारी स्री, अन्यायाविरुद्ध बंद पुकारणारी स्री, आत्मनिर्भर स्री, आव्हान पेलणारी स्री, पुरुषप्रधानता नाकारणारी स्री,

उदरनिर्वाह करण्यासाठी बाहेर पडलेली स्री इ. अशा अनेक स्री प्रतिमा नाटकांतून आविष्कृत केल्या आहेत.

**परंपरा आणि नवता याच्या उंबरठ्यावर उभी असलेली स्री:**

‘ दुभंग ‘(१९८१) या नाटकातून अर्थाजनासाठी बाहेर पडलेल्या स्रीचे रूप दिसते. ‘ मनोरमा ‘ ही स्वतः सुशिक्षित स्री आहे. हुजुरपागेच्या शाळेत मुख्याध्यापिका म्हणून नोकरी करते. या नाटकातून आधुनिक स्री साकारली आहे. आधुनिकतेबरोबरच तिने तिच्यावर झालेल्या संस्कारांना तिलांजलि न देता आपल्या संस्कारांची शिदोरी स्वतः बरोबर बांधलेली दिसते . आपला नवरा परस्रीच्या आकर्षणात गुंतला आहे याची जाणीव होताच ती आपल्या मुलीसह घराबाहेर पडते यातून तिच्यातील प्रकट झालेला स्वाभिमान, अस्मिता यांची जाणीव होते परंतु नवरा आर्थिक संकटात सापडला आहे हे कळताच ती स्वगृही परतते आणि पुनः नव्याने संसार करते कारण तिच्या ठायी असणाऱ्या क्षमा या गुणधर्मामुळे ती एक आदर्शवादी स्री प्रतिमा म्हणून बाहेर येते. दुभंग नाटकातून मनोरमेने परंपरा आणि नवता यांचा समन्वय साधला आहे. ‘ जोडीदार ‘ (१९८२) या नाटकातील ‘ शरयू ‘ही देखील परंपरा आणि नवता यांचा समन्वय साधतांना दिसत आहे.

स्री शिक्षणाचा झालेला प्रचार प्रसार, स्रीमुक्ती चळवळीतून आलेले आत्मभान यातून परंपरा आणि नवता याचे चित्रण ‘ कहाणी ‘ (१९८९) या नाटकातील ‘सरिता ‘ या स्री प्रतिमेतून घडते. तिच्यावर झालेल्या पारंपरिक संस्कारांना न भेदता ती ‘ मेयर ‘ या पदापर्यंत जाऊन पोचते आणि आपल्यातील कर्तुत्व सिद्ध करते. परंतु स्रियांच्या शोषणाची पाळेमुळे पुरुषप्रधान संस्कृतीत दडलेली आहेत हा समाजसुधारकांचा विचार ती देखील मांडते ती म्हणते, “या पुरुषप्रधान संस्कृतीची पाळेमुळे खणून काढली पाहिजेत, सगळ्या थरांवर हा लढा लढला पाहिजे त्याशिवाय क्रांति होणार नाही.” २ (पृष्ठ ४६) नैसर्गिक असमानतेतून तिची झालेली कुचंबणा, पुरुषांनी स्रियांना स्वतः च्या स्वार्थासाठी दिलेली दुर्बलता यांना न जुमानता ती आपले कर्तुत्व सिद्ध करताना दिसते .

**आत्मभान प्राप्त झालेली स्री :**

स्रीशिक्षणामुळे व स्रीमुक्ती चळवळीतून स्रियांच्या वैचारिक विश्वामध्ये बदल झाला. या परिवर्तनातून ‘ पंखांना ओढ पावलांची ‘(१९८१) या नाटकातील नायिका ‘ साधना ‘ एक महत्वाकांक्षी स्री म्हणून तिच्याकडे बघावे लागेल. आत्मभान प्राप्त झालेली ही नायिका परंपरेचा उंबरठा ओलांडून संशोधनासाठी बाहेर पडते. या नाटकातून साधनेच्या रुपातून स्रीचे स्वअस्तित्व,तिचा ध्येयासाठी असलेला संघर्ष, तिची निर्णयक्षमता या पैलुंचे दर्शन घडते.

विजय तेंडुलकरांचे ‘ कमला ‘ (१९८१) हे नाटक स्री ला आपल्या दुय्यमत्वाची आणि गुलामगिरीची जाणीव करून देणारे नाटक आहे. स्री आणि पुरुष यांच्यातील नैसर्गिक भेदातून निर्माण झालेला सत्ता संघर्ष, स्रीकडे वस्तु म्हणून बघण्याचा दृष्टिकोण आणि त्यातून या नाटकातील ‘ सरिता ‘ या नायिकेला आलेले आत्मभान, स्रियांच्या अस्तित्वाची झालेली जाणीव यावर प्रकाश टाकला आहे. या संदर्भात या नाटकात सरिताची भूमिका केलेल्या जेष्ठ अभिनेत्री लालन सारंग यांचा अनुभव बोलका आहे. त्या म्हणतात,

“आजपर्यंत मला वाटायचे आपण स्वतंत्र आहोत, पुरुषांच्या बरोबरीने आपण शिक्षण घेऊ शकतो. एकाच व्यासपीठावरून भाषण करू शकतो, आपल्याला पाहिजे तेव्हा आपण बाहेर जाऊ येऊ शकतो, पान आपण स्वतंत्र आहोत का? ज्या प्रश्नांकडे मी कानाडोळा केला. ते प्रश्न मला सरिता करू लागल्यानंतर अक्षरशः माझ्या पाठलाग

करू लागले. कमळाने मला खडबडून जागे केले. कमला ने मला आत्मभान दिले " ३

या नाटकातून स्त्रियांना आत्मपरीक्षणाची, स्त्रीस्वातंत्र्याची, स्त्रीअस्तित्वाची जाणीव झालेली दिसते .

**स्वनिर्णयक्षमता असलेली पुरोगामी स्त्री:**

अशोक पाटोळे यांचे ' आई रिटायर होतेय '(१९८९) या नाटकातून फक्त कुटुंबाच्या सेवेत मग्न असलेल्या आईचे झालेले मतपरिवर्तन या नाटकातून दिसून येते. कुटुंबाच्या सेवेसाठी आपले सर्व जीवन वेचणारी ती , समाज कार्याची आवड असलेली लग्नानंतर समाजकार्य बंद करणारी ती, दुसऱ्यांच्या मर्जीखातर आपले लेखन कार्य बंद करणारी ती, स्वतःच्या भावना, व्यक्ति स्वातंत्र्य यांना महत्व न देणारी ती जेव्हा तिच्यातली अस्मिता दुखावली जाते तेव्हा ती परंपराधिष्ठित स्त्री सर्व बंधने झुगारून देते. तेव्हा ती म्हणते,

" विसरा की मी तुमची आई आहे, की सासू आहे, की बायको आहे, आणि सेवा करून करून पार कायापालट झालेल्या पन्नास वर्षापूर्वीच्या एका सात आठ वर्षाच्या मुलीकडे बघा ही भातुकली खेळता खेळता मोलकरीण कधी झाली तिला कळलंच नाही. लग्नापूर्वी आणि लग्नानंतरसुद्धा मी स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढले. आजही मी तेच करतेय. आज मीच मला समोर ठेवून बघतेय आणि मला दिसतेय हजारो वर्ष अन्यायात खितपत पडलेली गुलाम स्त्री – मुलगी ह्या नावाने समाजानं विकत घेतलेली आणि म्हातारी म्हणून अडगळीत फेकलेली एक स्त्री . "(पृष्ठ ४० )

या नाटकातून आईची प्रतिष्ठा जेव्हा पणाला लागते तेव्हा ती पुरोगामीपणाचा, परंपरावादाचा बुरखा फाडून स्वतः च अस्तित्व निर्माण करण्यासाठी घराबाहेर पडण्याचा निर्णय घेते. स्त्री जन्माबरोबर ' रांधा वाढा उष्टी काढा ' हे तिच्या पाचविला पूजलेले असते. त्यातून तिची सुटका नसते. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्री शिकलेली, नोकरी करणारी असली तरी ती गृहकर्तव्यदक्ष स्त्री असावी लागते. त्यातून तिची सुटका होत नाही आणि गृहिणीला रजा नाही, सुट्टी नाही, पगार नाही आणि रिटायरमेन्ट अजिबातच नाही, त्यामुळे या नाटकातून आईने घेतलेला निर्णय बदलत्या काळाचे परिवर्तनाचे सुचन आहे.

**समारोप :**

अशा प्रकारे स्त्री मुक्ती चळवळीतून स्त्रियांमध्ये जे परिवर्तन घडून आले त्याचे चित्रण नाटकातून प्रभावीपणे मांडले आहे. भारतीय स्त्रीचे जीवन पहिल्यापासून रूढी, परंपरा,धार्मिकता यांनी व्यापलेले आहे. तिने परंपरेच्या जोखडातून स्वतःला कधीही बाहेर काढले नाही. काळाच्या ओघात, पाश्चिमात्य संस्कृतीच्या फॅडातून समाजातील बंधने हळूहळू कमी झालेली असली तरी तिच्या मनावर तिने स्वतःच बंधने घातलेली आहे. त्यातून ती हळूहळू कात टाकत आहे.

स्त्री मुक्ती चळवळीनंतरच्या नाटकांतून, स्त्रीशिक्षण, स्त्री स्वातंत्र्य,स्त्री सुधारणा यांना महत्व दिले आहे. किनारा, दुभंग, जोडीदार यातील स्त्री नायिका परंपरा आणि नवता यातून स्वतः ला सिद्ध करतात. त्यांच्यात शिक्षणाच्या माध्यमातून आलेली प्रगल्भता दिसून येते. घराचा उंबरठा ओलांडून ती स्वतःचे अस्तित्व सिद्ध करू पाहते. पंखांना ओढ पावलांची, कमला या नाटकातील स्त्री नायिकांतून स्त्रीला आलेले आत्मभान, गुलामीची, दास्यत्वाची झालेली जाणीव प्रकट झाली आहे. त्यातून त्यांनी मार्ग काढून स्वतःला सिद्ध केले आहे.

बदलत्या जीवनशैलीला तिने आत्मसात करून स्वतःमध्ये बदल घडवून आणला आणि समाजाला देखील बदलायला भाग पाडले. ती विविध प्रतीमांतून जगासमोर

आली. स्वतः ला स्वयं प्रकाशित करण्यासाठी तिने केलेला प्रवास. तिचा संघर्ष, झालेली विटंबना,कधी जिंकली तर कधी हरली परंतु या सर्वात ती  दिपस्तंभासारखी उभी राहिली!!!

**संदर्भ सुची:**

१) लोकहितवादींची शतपत्रे – एक पत्राचा उल्लेख  संदर्भ – " स्त्री अस्मितेचा आविष्कार एकोणाविसावे शतक "- मृणालिनी जोगळेकर, भाग ३ ताराबाई शिंदे व जनाक्का शिंदे, पॉप्युलर प्रकाशन, १९९१. ( पृष्ठ -४९ )